स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

समाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील
पीएच.डी. पदवी साठी सादर करावयाचा

<u>संशोधन आराखडा</u>

संशोधन विषय

कै. तात्यासाहेब कानोले : व्यक्ती आणि कार्य

संशोधक

विनायक नथुराम तंत्रे

मार्गदर्शक

प्रा.डॉ.राहूल वरवंटीकर
सहा. प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख,
प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड.

मे २०१९

कै. तात्यासाहेब कानोले : व्यक्ती आणि कार्य

प्रास्ताविक :

नांदेड जिल्हा हा औरंगाबाद विभागातील ऐतिहासिक जिल्हा म्हणून ओळखला जातो.पवित्र गोदावरी नदीवरील नांदेड जिल्हा हा मध्यवर्ती क्षेत्र असल्याने त्यास गोदावरीचे नाभीस्तान मानले जाते. जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण असलेले नांदेड हे शहर गोदावरी नदीच्या काठावर वसलेले आहे. नांदेड जिल्ह्यास फार प्राचीन परंपरा लाभली आहे. पुराणांतर्गत प्रसंग त्याने पाहिले आहेत अशा कथा आहेत.या जिल्ह्याला थकल्या भागल्या वनवासी पांडवांचे पाय लागले होते असे म्हणतात. नंद राजांची शान, त्यांच्या राज्यात झालेल्या उलथापालथी नांदेडने बघितल्या आहेत. शालीवानच्या काळात भारत वर्षातली एक मोठी बाजार पेठ होण्याचा मान त्यांनी मिळवलेला आहे. त्याच बरोबर नांदेड शहरावर सातवाहनांनी, वाकाटकांनी, राष्ट्रकुटानी, पुर्व चालूक्य, यादवांनी, मुगल, निझाम, भोसले, पेशवे, शिंदे, होळकर या घराण्यांच्या पाऊल खुणांचा व स्मृतीचा ऐतिहासिक स्पर्श नांदेड शहराच्या इतिहासात आढळून येतो.

प्रत्यक्ष ऐतिहासिक कालखंडातील नंद मौर्य कालखंडात नांदेडचे अस्तित्व काही पुराव्या आधारे सिध्द होते. नंद साम्राजांची उपराजधानी गोदातीरी नंवनंदडेहरा या ठिकाणी होती.ही नवनंदडेहरा नगरी म्हणजेच आजचे नांदेड शहर होय. नवनंदडेहरा या प्राचीनतम शब्दापासून नवनंदकेहरा, नंदडेरा, नंदीतड, नंदीएड आणि नांदेड असा अपभ्रंश होऊन आजचे नांदेड हे नाव प्रचलीत झालेले आढळून येते. या रुपांतराचे तर्कशुध्द विवेचन जसे लक्षणीय ठरते तसेच प्रत्यक्ष ऐतिहासिक पुरावेही दुर्लक्षणीय नाहीत. पहिल्या शतकात नवनंडेहराचे रुपातर बौध्दकाळात नंदीतडात झालेले दिसते. या नंदीतडावरच कालांतराने किल्ला उभारला गेला आणि नंदीतडवरच नंदगिरी उदयास आले. रामायण काळात वास्तवात आलेले नांदेड पुढे बौध्दकाळातही अस्तित्वात राहते, ही गोष्ट बावरी या बौध्द जिज्ञासूच्या जातकात दिसते.चौथ्या शतकात नंदगिरीवर सातवाहन घराण्याचे राज्य होते हे एका विश्वसनीय पुराव्यावरुन सिध्द झाले आहे. तसेच वाशिम येथे सापडलेल्या ताम्रपटावर देखील 'नंदीतटावरील ....'असा संदर्भ आढळून आला. यावरुन सिध्द होते की, सोळाशे वर्षापूर्वी नांदेड नंदीतड म्हणून ओळखले जात असावे. यानंतर दहाव्या शतकातील राष्ट्रकूट घराण्याच्या कंधार तालुक्यातील शिलालेख ही महत्त्वाचा पुरावा ठरला या शिलालेखावर देखील नंदितड...असा उल्लेख आहे तसेच बाराव्या शतकातील चालुक्य घराण्याचे राज्य असलेल्या देगलूर तालुक्यातील होट्टल येथील 'नंदितड'असा केलेला आढळतो. याचाच अर्थ बाराव्या शतकापर्यंत नंदीतड हेच नाव प्रचलित होते. परंतु यादव घराण्याच्या सत्तेत कधीतरी नंदितडचे नंदीड झ ाालेले दिसून येते. इतिहास हा केवळ डोळ्याने वाचावयाचा नसतो तो बुध्दीने जाणावयाचा असतो व तर्काने तोलावयाचा असतो या प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या विचारानुसार संशोधनात संपूर्ण माहिती विश्लेषणात्मक पध्दतीने मांडली आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व आणि व्याती:

गेल्या शतकात नांदेड हे विद्या आणि कलांच्या बाबतीत अग्रेसर असे एक स्थान होते. नांदेडला संस्कृत अध्ययनाचा वारसा असून महामहोपाध्याय यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे यांनी संस्कृत पाठशाळेची स्थापना

होळी येथे केली. तसेच कै. अण्णासाहेब गुंजकर यांनी गायन-वादन विद्यालयाची स्थापना करुन संगीताच्या अभ्यासाची परंपरा चालविली. त्र्यंबक वसेकर यांनी अभिनव चित्रशाळेची स्थापना करुन कलेचा वारसा जपला. कै. नरहर कुरुंदकर यांनी साहित्याच्या क्षेत्रात मोठे योगदान करुन, तर कै. तात्यासाहेब कानोले यांनी इतिहास संशोधनाचे कार्य केले. विसाव्या शतकाच्या प्रारंभी जेव्हा उर्दू भाषेतच सर्वत्र प्रभाव होता त्या नांदेडमध्ये कै. तात्यासाहेब कानोले यांनी हस्तलिखित कागदपत्रांचा धांडोळा घेत इतिहास आणि साहित्य संशोधनाला प्रारंभ केला. पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळाच्या पाक्षिक सभांमधून इतिहासाचार्य तात्यासाहेब कानोले यांनी शोधनिबंध वाचले. मंडळाच्या संशोधन पत्रिकांमधून त्या काळात त्यांचे अनेक लेख प्रकाशित झाले. त्यांनी केलेल्या हस्तलिखित कागदपत्रांच्या धांडोळ्याला मूर्तरुप आले. ते गोदातीर इतिहास संशोधन मंडळाच्या स्थापनेने १५ फेब्रुवारी १९५४ रोजी महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या शुभहस्ते या संस्थेची प्रतिष्ठापना झाली. प्रारंभी 'हिस्टॉरिकल ॲण्ड लिटररी सोसायटी' या नावाने ही संस्था अस्तित्त्वात आली आणि प्रांत पुनर्रचनेनंतर 'गोदातीर इतिहास संशोधन मंडळ' या रुपाने ही संस्था कार्यरत झाली.

संस्थेचे सचिव तात्यासाहेब कानोले यांनी पदरमोड करुन आयुष्यभर हस्तलिखित कागदपत्राचा धांडोळा घेतला. ज्ञानेश्वरीच्या दुर्मिळ प्रती त्यांचा संग्रालयात उपलब्ध आहेत. इतिहासाचार्य वि.का. राजेवाडेंच्या भ्रमंतीतून प्रेरणा घेऊन तात्यासाहेबही हस्तलिखितांच्या शोधात गावोगावी हिंडत राहिले. त्यांच्या या भ्रमंतीतून हस्तलिखितांचा प्रचंड संग्रह संग्रहीत झाला. अनेक दुर्मिळ हस्तलिखिते त्यांच्या संग्रही आहेत. अंबानगरीचे मुकुंदराज आणि रघुनाथ शेष घराण्यासंदर्भातली दुर्मिळ कागदपत्र 'गोदातीर इतिहास संशोधन मंडळाच्या' संग्रहात आहेत.

तात्यासाहेब कानोले यांचे गोदातीर इतिहास संशोधन मंडळः

विश्वेश्वर अंबादास तथा तात्यासाहेब कानोले (ऑगस्ट१९०४-फेब्रुवारी १९८४) हे जुन्या पिढीतील श्रेष्ठ इतिहास संशोधक होते. त्यांच्यापासून नांदेडमध्ये इतिहास संशोधनाची परंपरा सुरु झ ाली नांदेड व मराठवाड्याच्या इतिहासासबंधी त्यांनी मौलिक संशोधन केलेले आहे. आपल्या इतिहास संशोधन कार्याला मूर्त स्वरुप देण्यासाठी त्यांनी १९५४ साली नांदेडला इतिहास व वाङमय संशोधन मंडळाची स्थापना केली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर ह्या मंडळाचे 'गोदातीर इतिहास संशोधन मंडळ' असे नामकरण झाले. तात्यासाहेब कानोले ह्या नावनेच ते सुप्रसिध्द झाले. कानोले हे संशोधन मंडळाचे संस्थापक, संशोधक, संचालक (Director) व सर्वेसर्वा होते. प्रतिकूल परिस्थिती व दारिद्र्याच्या खस्ता खाऊन त्यांनी आयुष्यभर संशोधन केले आणि संस्कृत, उर्दु, फार्शी व मराठीतील हजारो हस्तलिखिते, पोथ्या, हुकुमनामे, सनदा, चित्रे व मूर्तिशिल्पे संग्रहित केली. नंतर डॉ.गो.बं.देगलूरकर, डॉ.प्रभाकर देव व अन्य संशोधकांची संशोधित शिल्पे गोदातीर इतिहास मंडळात सुरक्षित ठेवलेली आहेत. प्रारंभी ही ऐतिहासिक कागदपत्रे तात्यासाहेबांच्या वजिराबाद येथील निवासस्थानी होती.नंतर ही वाङ्मयीन साधने व शिल्पे कलामंदिराच्या दालनात ठेवण्यात आली. माजी कुलगुर व प्राचार्य डॉ.गो.रा.म्हैसेकरांच्या प्रयत्नांतुन गोदातीर इतिहास संशोधन मंडळाला १०,०००चौ.फु.ची जागा मिळाली आणि तेथे मंडळाची भव्य

वास्तू निर्माण झाली. ही इमारत आंध्रा समिती हायस्कूल, निमाभवनच्या समोर व जिल्हा रुग्णालयाच्या मागच्या बाजूस(दक्षिणेस) आहे.विद्यमान कार्यकारी मंडळ कलामंदिरातील ऐतिहासिक साधनसामुग्री स्वतःच्या वास्तूत नेऊन भव्य वस्तुसंग्रहालय तयार करण्यासाठी प्रयत्नशील आहे. कै.शंकररावजी चव्हाण, डॉ.गो.रा.म्हैसेकर, डॉ.गो.बं.देगलूरकर, डॉ.प्रभाकर देव (माजी संचालक), डॉ.डी.एस.देशपांडे, डॉ.पी.जी.जोशी (विद्यामान संचालक), श्री.विद्याधर व मोहन कानोले, डॉ.श्रीनिवास पांडे, डॉ.व्ही.टी.देशपांडे, श्री यशवंत नांदेडकर, डॉ.किरण देशमुख ह्या सर्व हितचिंतक कार्यकत्यांनी मंडळाचे कार्य यथाशक्ती चालू ठेवलेले आहे. तात्यासाहेब कानोले यांचे कार्य मुख्यतः वाङमयीन संशोधनात्मक (Archieves) स्वरुपाचे आहे. गोदातीर इतिहास संशोधक मंडळ ही केवळ इतिहास संशोधनाला वाहिलेली संस्था असून कानोले व मंडळ अव्दैत परब्रह्मासाखे एकरुप झालेले दिसून येतात तथापि त्यांच्या निधानानंतर ह्या सांस्कृतिक संस्थेची अपेक्षित प्रगती झाली नाही.

कै.तात्यासाहेब कानोलेंचे संशोधन कार्य म्हणजे गोदातीर मंडळाचे कार्य असे समीकरणच निर्माण झाले. त्यादृष्टीने तात्यासाहेबांच्या संशोधन कार्याचा आढावा घेणे अपरिहार्य ठरते. लिखित साधनांचा धांडोळा घेणे, त्यांची शास्त्रोक्त चिकित्सा करणे व उपलब्ध इतिहासाचा अन्वयार्थ लावणे ही त्यांची संशोधने पध्दती होती. अंबाजोगाईचे मुकुंदराज, नांदेडचे वामन पंडित व ज्ञानेश्वरीची प्राचीन प्रत ही त्यांची संशोधने धक्कादायक, क्रांतीकारी व इतिहास बदलून टाकणारी होती. त्यामुळे त्यांचा महाराष्ट्रभर लौकिक झाला. इतिहास संशोधन हेच जीवितकार्य मानलेल्या ध्येयवेड्या तात्यासाहेबांचा गौरव म.म.दत्तोवामन पोतदार यांनी खालील प्रमाणे केला आहे, कानोले यांना त्यांच्या संशोधन कार्यबद्दल लोक भ्रमिष्ट म्हणतात; हे ऐकूण मला तितकाच आनंद वाटला. कारण ते चांगले कसाला उतरले आहेत(संशोधक ठरले आहेत) अशी माझी खात्री झाली.....मनुष्य वेडा तेव्हाच होतो जेव्हा त्याला जीवनातील इतर सर्व आनंद इतिहासापुढे फिके वाटतील....

अशा ह्या ध्येयासक्त महान इतिहास संशोधकाचा जन्म स.१९०४ च्या ऑगस्टमध्ये जुन्या नांदेडमधील सिध्दनाथपुरी भागात झाला. कानोले घराण्याचा व्याप व लौकिक मोठा होता. धर्मशास्त्रे, ज्योतिष्य, संगीत व संस्कृत पांडित्य या घराण्यात दिमाखाने वावरत होते. वडील अंबादास उपाख्य भटजी कानोले संस्कृत शास्त्राचे गाढे व्यासंगी व दशग्रंथी होते. आणि विश्वेश्वर कानोलेंचे शिक्षण उर्दु मॅट्रिकपर्यंत झाले. मात्र इंग्रजीचे त्यांना उत्तम ज्ञान होते आणि उर्दु, फार्शी व संस्कृत भाषा त्यांना अवगत होत्या. हे भाषाज्ञान त्यांना संशोधनासाठी फार उपयुक्त ठरले. लहानपणासूनच त्यांनी मराठी वाङ्मय व इतिहास संशोधनाची गोडी लागली आणि नांदेड व मराठवाड्याच्या इतिहास संशोधनाचा ध्यास घेतला. हैद्रबाद मुक्ती आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग होता. निजामी राजवटीची कडक बंधने असताना त्यांनी पुढाकार घेऊन प्रयत्नपूर्वक १९३८ साली निजाम प्रांतीय मराठी साहित्य परिषदेचे संमेलन भरविले. म.म.पोतदार अध्यक्षस्थानी होते व परिषेदेचे सचिव स्वतः तात्यासाहेब कानोले होते. तात्यासाहेबांनी ह्या संमेलनात स्वतः संशोधित केलेल्या कागदपत्राचे व हस्तलिखितांचे प्रदर्शन भरविले. पोतदारांनी त्यांचा गौरव केला आणि कानोलेंनी त्यांना गुरुस्थानी मानून आपले संशोधन कार्य सुरु ठेवले. वयाच्या बाविसाव्या वर्षापासून त्यांनी संशोधनाला प्रारंभ केला. आयुष्यभरात त्यांनी २००० हस्तलिखिते गोळा केली व शंभराच्यांवर शोधनिबंध लिहिले.त्यांचे चार संशोधन ग्रंथ आहेत. एकनाथ पूर्वकालीन ज्ञानेश्वरीची सर्वात जुनी प्रत कानोलेंना प्राप्त झ

ाली. 'नांदेडप्रत' म्हणून केतकरांनी तिचे प्राचीनत्व मान्य केले. संत दासगणू महाराजांनी त्यांचे 'आधुनिक राजवाडे' म्हणून कौतुक
केले.वाङ्मयीन संशोधन, ऐतिहासिक संशोधन व नांदेडचा संशोधित इतिहास ह्या तीन गटात त्यांच्या संशोधनाची
वर्गवारी करता येते-

१) 'मुकुंदराजांची अंबानगरी कोणती?' ह्या ग्रंथांत त्यांनी आद्यकवी मुकुंदराज विदर्भातील अंभोरचे नसून मराठवाड्यातील मनोहर अंबानगरी म्हणजे अंबाजोगाईचे होते हे पुराव्यासह सिध्द केले.

२) 'कवी वामन पडितांविषयी नवीन माहिती' ह्या दुसऱ्या ग्रंथात पसिध्द मराठी संतकवी वामन पंडित विजापूरचे नसून त्यांचे मूळचे शेष घराणे नांदेडचेच होते असे आग्रहाने स्पष्ट केलेले आहे. त्यासाठी त्यांनी शेष घराण्याची वाटणीपत्रे व हूकूमनामे यांचे दाखले दिले.

३) कवी वामन पंडिताचे पुत्र रघुनाथ शेष यांचे 'कृष्णकौतुक' हस्तलिखित शोधून ते ग्रंथरुपाने प्रसिध्द केले.

४) संत एकनाथांचा भावार्थ रामायणाचे उत्तरकांड शिष्य गावबाने पूर्ण केले नसून नाथाचा नातू मुक्तेश्वरांनी रचले, हे महत्त्वपूर्ण संशोधन त्यांनी एका लेखतून प्रसिध्द केले.

याशिवाय शहागडचे कवी विठ्ठल बीडकर, सिंहराजकवी, शुकानंदाची देशिक गुरुपरंपरा, नांदेडचे रामकृष्ण सोमयागी, नांदेडची प्राचीन कविपरंपरा व नाट्यपरंपरा, विश्वनाथाचे अभिमन्यू विवाह, अनुभवामृत व डिंभ कवीचे ऋध्दिपूर महात्म्य इ. कानोलेंचे वाङ्मयीन संशोधित लेख आहेत.

विविध साधनांच्या आधारे तात्यासाहेबांनी 'नांदेडचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास' शोधून काढला. हे लेख नांदेडच्या इतिहासाचे एकमेव आधार आहेत. 'नांदेडचे पुण्योदय सरोवर कोठे असावे' ह्या लेखात जुन्या नांदेडच्या मारवाड गल्ली-होळी परिसरात पुराण वर्णित पुण्योदय सरोवर होते, असा निष्कर्ष काढला. नांदेडच्या नऊ टेकड्यांवरुन नांदेडचे नवनंदडेरा हे प्राचीन नांव पडले आणि कांही टेकड्या वस्तींची नावे आजही शिल्लक आहेत, हे संशोधन त्यांनी 'नांदेड शहराचे सांस्कृतिक-ऐतिहासिक महत्त्व' ह्या लेखात मांडले. मयुरेश्वरशास्त्रीच्या हस्तलिखित 'नंदीतट विजय' ग्रंथांच्या आधारे त्यांनी उर्वशितीर्थ व इतर तीर्थक्षेत्राच्या वर्णनामधून पुराणकालीन नांदेडचे प्राचीनत्त्व सिध्द करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'पूर्वजाख्यान' ह्या सरदेशपांडे घराण्याच्या बखरीच्या आधाराने त्यांनी मोगल कालीन नांदेडच्या इतिहासावर प्रकाश टाकलेला आहे. 'वजीर महमूद गवानचे वजिराबाद', तेलंगणात नसून मराठवाड्यात होते. तत्कालीन फार्शी कागदपत्रातील आष्टूर-मलकापूर गांवे नांदेडजवळ असून विद्यमान वजिराबाद येथे भव्य वाडा बांधून महमूद गवान राहात होता. तेंव्हापासून(१४८०) वजिराबाद अस्तित्वात आले, असा वजिराबादचा इतिहास त्यांनी कथन केला. नांदेड येथील सचखंड गुरुव्दाराचा साद्यंत इतिहास एका स्वतंत्र लेखमधून उधृत केलेला आहे. 'पन्नास वर्षांपूर्वीचे नांदेड' ह्या बावीसपानी लेखामधून अर्वाचीन नांदेडची जडणघडण कशी झाली. ह्या विषयाची दुर्मीळ माहिती तात्यासाहेबांनी दिलेली आहे. त्यात जुने नांदेड, गाडीपुरा, टॉवर मोंढा, गुरुव्दारा, वजिराबाद,उस्मानशाही मिल, सुतगिरण्या, सडका व रेल्वेमार्ग आदींचा

सविस्तर तपशील आहे. 'नांदेड येथील शंकराचार्याचा मठ' व 'नाशिककर नारायणबुवा स्वामी' ह्या दोन लेखांमधून सिध्दनाथपुरी व संस्कृत पाठशाळेचा दोनशे वर्षांचा ऐतिहासिक वृत्तांत सांगितलेला आहे. गुरु गोविंदसिंहाच्या चरित्रात चौफाळा संगत साहेब, अबचलनगर गुरुव्दारा, इतर गुरुव्दारे व गुरु गोविंदजीच्या स्वर्गवासाची माहिती दिलेली आहे. इतर संशोधित लेखांमधून नांदेडच्या धार्मिक व सांस्कृतिक इतिहासाचे संदर्भ स्पष्ट केलेले आहेत.

नांदेड शहराप्रमाणेच 'नांदेड जिल्ह्याचा इतिहास' कानोलेंनी आपल्या विविध लेखांमधून उधृत केलेला आहे. कंधारच्या शिलालेखातील माहितीच्या आधारे त्यांनी कंधारमधील प्राचीन मंदिराचा इतिहास स्पष्ट केलेला आहे. हे कंधार अफगाणिस्तानातील नसून नांदेड जवळील राष्ट्रकूट कालीन कंधारपूर आहे. तिसऱ्या कृष्णदेवराजाने 'कंधारपूरवराधीश्वर' ही पदवी घेतली. त्याने वास्तुपुरुष कालप्रिय नाथाचे विशाल भूपृष्ठ मंदिर व इतर मंदिरे बांधली. हा प्राचीन कंधारचा महीमा 'राष्ट्रकूट कालीन खंदार येथील कालप्रिय नाथ मंदिराचा इतिहास' ह्या शोध निबंधामधून कथन केलेला आहे. Inscriptions from Nanded District ह्य डॉ.रित्ती व डॉ.शेळके यांच्या ग्रंथाला दिलेल्या प्रस्तावनेत व उत्तर चालुक्य कालीन नांदेड जिल्ह्यातील शिलालेख ह्या लेखात नांदेड जिल्ह्यातील करडखेड, देगलूर, होट्टल, तडखेल, खानापूर, मुखेड, एकलारा, बाऱ्हाळी, जुन्नी, कंधार, सगरोळी, संगम व अर्जापूर येथील मंदिरे, स्थापत्य शिल्प, धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक इतिहासाची साधार चिकित्सा केलेली आहे. 'गुरु गोविंदसिंहाचे संक्षिप्त चरित्र' ह्या छोटेखानी ग्रंथात शीख धर्माची परंपरा, दशमगुरु कलगीधर श्री गुरु गोविंदसिंहाचे चरित्रकार्य नांदेडला आगमन-वास्तव्य, गुरुग्रंथसाहेबांची प्रतिष्ठापना व स्वर्गवास अदींची विश्वसनीय माहिती कानोलेंनी ह्या ग्रंथात नोंदविलेली आहे. हा गुरु गोविंदसिंहाचा मराठी भाषेतील पहिलाच चरित्र ग्रंथ(१९२६)आहे. नरसी बामणीचेच (हिंगोली) संत नामदेव होते हे त्यांनी पुराव्यासह स्पष्ट केलेले आहे. नेताजी पालकर व त्यांचे वंशज ह्या लेखात शिवाजी महाराजांचे पराक्रमी सेनानी नेताजी पालकर वृध्दापकाळी नांदेड जिल्ह्यातील तामसा येथे राहीले हे ऐतिहसिक सत्य त्यांनी उलगडून दाखविले.तात्पर्य मराठी वाङमयाचा इतिहास, नांदेड नगरीचा इतिहास व नांदेड जिल्ह्याचा महत्त्वपूर्ण इतिहास तात्यासाहेब कानोले व त्यांच्या गोदातीर इतिहास संशोधन व नांदेड जिल्ह्याचा महत्त्वपूर्ण इतिहास तात्यासाहेब कानोले व त्यांच्या गोदातीर इतिहास संशोधन मंडळामुळेच अभ्यासकांना उपलब्ध झाला. नांदेड व मराठवाड्यात तात्यासाहेबांनी इतिहास संशोधनाची पायाभरणी केली. मात्र ह्या भव्य वास्तूची अपेक्षित भरभराट होणे गरजेचे आहे.

कै. तात्यासाहेब कानोले यांनी केलल्या या योगदानाचा चिकित्सक अभ्यास आजवर झालेला नाही. म्हणून प्रस्तुत संशोधकाने हा विषय प्रबंधासाठी निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१. कै. तात्यासाहेब कानोले यांचे चरित्र अभ्यासणे.

२. कै. तात्यासाहेब कानोले यांच्या इतिहास संशोधनपर प्रसिध्द लेखांचा चिकित्सक अभ्यास करणे.

३. कै. तात्यासाहेब कानोले यांच्या गोदातीर इतिहास संशोधन मंडळाच्या संग्रहात असलेल्या हस्तलिखितांची वर्गवारी करुन त्याचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करणे.

४. कै. तात्यासाहेब कानोले यांच्या महाराष्ट्राच्या तसेच नांदेड जिह्याच्या इतिहासाला झालेल्या योगदानाचे मुल्यांकन करणे.

५. निष्कर्षाची मांडणी करणे

संशोधनाच्या मर्यादाः

प्रस्तूत संशोधन हे कै. तात्यासाहेब कानोले यांच्य इतिहासाच्या अध्ययनाला झालेल्या योगदानापुरते मर्यादित आहे. तसेच हे संशोधन गोदातीर इतिहास संशोधन मंडळातील उपलब्ध कागदपत्रे व पुरावे यांच्या आधारे करण्यात येईल.

संशोधनाची गृहीतके :

प्रस्तुत संशोधनाची गृहीतके खालीलप्रमाणे आहेत.

१. कै. तात्यासाहेब कानोले यांनी केलेल्या इतिहास संशोधनातून महाराष्ट्राच्या तसेच नांदेडच्या इतिहासावर महत्त्वपूर्ण प्रकाश पडतो.

२. गोदातीर इतिहास संशोधन मंडळाच्या संग्रहात असलेल्या हस्तलिखितातूनही अनेक इतिहास विषयक प्रश्नांवर मौलिक प्रकाश पडतो.

३. गोदातीर इतिहास संशोधन मंडळाच्या संग्रहातील हस्तलिखितांचे संपादन व प्रकाशन होणे आवश्यक आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासिक विश्लेषणात्मक स्वरुपाचे चिकित्सक संशोधन आहे. हे संशोधन गोदातीर इतिहास संशोधन मंडळाच्या संग्रहातील हस्तलिखितांवर तसेच कै. तात्यासाहेब कानोले यांच्या प्रतिध्द साहित्यावर आधारलेले आहे. यासाठी प्रस्तुत विषयाची निगडीत विश्लेषणात्मक अभ्यासाची पध्दती स्वीकारण्यात आली आहे.

प्रकरण योजनाः

प्रस्तुत संशोधनाची प्रकरण योजना खालीलप्रमाणे राहिल-

१. प्रकरण पहिले : प्रास्ताविक

या प्रकरणात संशोधन विषयाचे महत्त्व, उद्दिष्टे, गृहीतके, मर्यादा आणि संशोधन पध्दतीची मांडणी करण्यात येईल. तसेच विषयाच्या अनुषंगाने पूर्व संशोधनांचा मागोवा प्रस्तुत करण्यात येईल.

२. प्रकरण दुसरे : कै. तात्यासाहेब कानोले यांचे जीवनचरित्र

पस्तुत प्रकरणात कै.तात्यासाहेब कानोले यांचे जीवनचरित्रविषयी सविस्तर चर्चा करुन त्यांच्या समग्र कार्याचा आढावा प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

३. प्रकरण तिसरे : गोदातीर इतिहास संशोधन मंडळ

प्रस्तुत प्रकरणात कै. तात्यासाहेब कानोले यांनी स्थापन केलेल्या गोदातीर इतिहास संशोधन मंडळाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास करण्यात येईल.

४. प्रकरण चौथे : कै. तात्यासाहेब कानोले यांच्या प्रकाशित साहित्याचा चिकित्सक अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात कै. तात्यासाहेब कानोले यांच्या प्रकाशित साहित्याचा चिकित्सक अभ्यास करण्यात येईल.

५. प्रकरण पाचवे : कै. तात्यासाहेब कानोले यांच्या संग्रहातील हस्तलिखितांचा चिकित्सक अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात कै. तात्यासाहेब कानोले यांनी संग्रहीत केलेल्या व गोदातीर इतिहास संशोधन मंडळाने जतन केलेल्या विविध ऐतिहासिक हस्तलिखितांचा चिकित्सक अभ्यास करण्यात येईल. यात ईस्तलिखितांची वर्गवारी करुन त्यांचे विषय, महत्त्व व संपादनाची आवश्यकता याविषयी चर्चा करण्यात येईल.

६. प्रकरण सहावेः निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाच्या निष्कर्षाची मांडणी करण्यात येऊन त्या अनुषंगाने शिफारशी करण्यात येतील.

प्रबंधाच्या शेवटी संदर्भ ग्रंथाची सूची व परिशिष्टे देण्यात येतील.

* संदर्भ सुची *

१. श्री. गुरुगोविंदसिंह यांचे संक्षिप्त चरित्र.
२. राष्ट्रकूटकालीन खंदार येथील कालप्रियनाथ मंदिराचा इतिहास.
३. उत्तर चालुक्याच्या नांदेड जिल्ह्यातील शिलालेखाने मराठवाड्याच्या प्राचीन इतिहासावर पडलेला प्रकाश.
४.काकतीय घराणे व त्याची पूर्वपिठीका.
५. नांदेडचे प्राचीन पुण्योदय सरोवर कोठे असावे.
६. नांदेडची प्राचीन कविपरंपरा.
७. श्रीज्ञानेश्वरीच्या उपलब्ध प्रती.
८. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या परंपरेतील एक अज्ञात कवि मुकुंदराज व तत्कृत योगविवेकमार्तंड नामक ग्रंथ.
९. संत नामदेवांची नरसी बामणी.
१०. भावार्थ रामायणाचे अज्ञात उत्तरकांड.
११. विप्र विश्वनाथकृतअभिमन्यु विवाह.
१२. श्रीकृष्णमुनि डिंभकृत रुध्दिपूर - महात्म्य
१३. विठ्ठल कवी बीडकर याचे एक प्रसिध्द काव्य - कमला शारदा संवाद.
१४. नेताजी पालकर आणि त्याच्या वंशजासंबंधी काही नवीन माहिती.
१५. प्रसिध्द बहमनी वजीर महमूद गवानचे वनिराबाद कोणते?
१६. श्री. हुजुर अबचलनगर सचखंड अकाल तखत गुरुव्दार मंदिर, नांदेड.
१७. नांदेडला १९२० मध्ये भरलेल्या दुसऱ्या सामाजिक परिषदेच्या निमित्ताने
१८. एकनाथ महाराजांचा एक प्रसिध्द ग्रंथ एकादशी महात्म्य.
१९. पन्नास वर्षांपूर्वीचे नांदेड.
२० मराठवाडा साहित्य संमेलन अधिवेशन दहावे बीड अध्यक्षीय भाषण
२१. नांदेड शहराचे धर्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्व आणि परंपरा.
२२. नांदेडचे शेष घराणे.
२३. सरदेशापांडे यांचे श्रीराम मंदिर.
२४. मराठवाड्यातील नाट्यपरंपरेचा इतिहास.

******